हिंदुस्थान
akolahindu@gmail.com
www.dainikhindusthan.com
शुक्रवार, दि. २३ मार्च २०१८
भारतीय सौर २ चैत्र १९४०


## थोडक्यात महत्वाचे

### महिला आरोग्य मेळावा संपन्न



**प्रतिनिधी**/२२ मार्च

**मुर्तिजापूर** : पतंजली योग समिती मुर्तिजापुरच्पा वतीने नुतनताई हरीष पिंपळे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच प्राचार्या श्रीमती कुमुदताई दुबे तसेच प्रा.डॉ.मनिषा यादव यांच्या प्रमुख उपस्थितीत, मोफत आरोग्य मेळावा पार पडला.कार्यक्रमाला नवाब क्लिनीकल लेबॉरेटरी टिम यांचे विशेष सहकार्य लाभले डॉ. कल्पना बियाणी व डॉ.स्वाती पोटे यांनी उपस्थित महीलांची तपासणी करुन त्या त्या रोगानुसार प्राणायम व आसना द्वारे उपचार केले.कार्यक्रमाचे आयोजक संत गजानन महाराज संस्थान विश्वस्थमंडळ यांच्या विशेष सहकार्याने कार्यक्रम शिस्तीत पार पडला प्रतिष्ठितांचे असेच सौजन्य असल्यास महिलांच्या सशक्तीकरणाकरिता महिलांचे संघटन करण्याकरीता प्रसंगानुरुप अपणअशा कार्यक्रमाचे आयोजन करु.असे विचार डॉ.स्वाती पोटे यांनी आपल्या प्रास्ताविकात मांडले उपस्थित मान्यवरांनी गुढिपाडवा हा दिवस महिला दिन म्हणुन जाहीर केल्याबध्दल पतंजलीचे आभार मानले पतंजलिच्या सर्व साधकांनी तसेच विलास वानखडे यांनी कार्यक्रम यशस्वी होण्याकरीता अथक परीश्रमघेतले सौ.ज्योती बनसोड यांनी संचलन तर आभार सौ.वैशाली आंबेकर यांनी मानले.

### खाजगी भागीदारी तत्वावर सघन कुक्कुट विकास गटाची स्थापना

**प्रतिनिधी**/२२ मार्च

**अकोला** : जिल्हयातील अकोला तालुक्यात शासकीय सघन कुक्कुट विकास प्रकल्प, अकोला येथे कार्यरत असल्याने अकोला तालुका वगळता उर्वरीत सहा तालुक्यात प्रती तालुका एक या प्रमाणे सहा सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर सघन कुक्कुट विकास गटाची स्थापना पुढील तिन वर्षात प्रति वर्षी दोन या प्रमाणे करणे प्रस्तावित आहेत. या अनुषंगाने प्राप्त मार्गदर्शक सुचनेनुसार सन २०१८-१९ या वर्षात सहा तालुक्यामधुन दोन तालुक्याची नावे निश्चित करण्याकरीता दिनांक १५ फेब्रूवारी २०१८ रोजी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,अकोला यांचे अध्यक्षतेखाली निवड समितीची सभा घेण्यात आली. या सभेत पातुर व बाळापूर या दोन तालुक्यातुन प्रती तालुका एक या प्रमाणे विहित निकषानुसार इच्छुक लाभार्थीचे अर्ज संबंधीत पशुधन विकास अधिकारी,(विस्तार) पंचायत समिती, यांचेकडे मागविण्याचे ठरविण्यात आले. संबंधीत पशुधन विकास अधिकारी,(विस्तार) पंचायत समिती, यांचेकडे याबाबतचा अर्जाचा नमुना उपलब्ध आहे. दिनांक २८ मार्च २०१८ पर्यत आवश्यक कागद पत्रासह सर्व इच्छुक लाभार्थीनी सदर अर्ज आवश्यक कागदपत्रासह विहित मुदतीत पशुधन विकास अधिकारी,(विस्तार) पंचायत समिती, पातूर/ बाळापुर यांच्याकडे सादर करणेबाबत याव्दारे कळविण्यात येत आहे.

### अकोला पान असोसिऐशन कार्यशाळा संपन्न

**प्रतिनिधी**/२२ मार्च

**अकोला** : राष्ट्रीय नियंत्रण तंबाखु कार्यक्रम जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालया मार्फत अकोला पान असोशिऐशन व तंबाखुजन्य पदार्थ विक्री दुकानदार यांची कार्यशाळा जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजकुमार चौव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १९ मार्च २०१५ रोजी हॉटेल तुषार येथे घेण्यात आली. सदर कार्यक्रमाचे उदघाटन सहसंचालक असंसर्गजन्य रोग आरोग्य सेवा मुंबई डॉ.साधना तायडे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख उपस्थिती उपसंचालक आरोग्य सेवा अकोला मंडळ डॉ.नितीन अंबाडेकर, निवासी वैघकिय अधिकारी (बा.सं.) डॉ. एम.डी.राठोड इत्यादींची होती. कार्यशाळेला येण्यापुर्वी वाटेतच एका पान सेंटर वर डॉ. साधना तायडे यांनी भेट दिली असता सदर पान सेंटरमध्ये नियमांचे उल्लंघन होतांना आढळुन आले. सदर कार्यशाळेला अकोला जिल्हातील व तालुक्यातील सर्वच पान असोसिऐशन व तंबाखु जन्य पदार्थ विक्री करणा-या संघटनांच्या पदाधीकारी व सदस्यांना आमंत्रीत केले होते. या प्रसंगी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजकुमार चौव्हाण यांनी प्रास्तावीक केले.

वाढत्या कर्करोगाच्या भिषनतेपासुन भावी पिढीला दुर ठेवण्याकरीता कालांतराने तंबाखुजन्य पदार्थ विक्री करण्याचा व्यवसाय नाहीसा करण्याचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजकुमार चौव्हाण यांनी आवाहन केले.

# कर दरवाढी विरोधातील आमरण उपोषण तुर्त स्थगित

## हायकोर्टाने याचिका दाखल करुन घेतल्याने आयुक्त व आंदोलकामध्ये झालेल्या चर्चेतून आंदोलन स्थगित

**प्रतिनिधी**/२२ मार्च

**अकोला** : अकोला महानगरपालिकेने नियमबाह्य करवाढ केल्यामुळे सदर करवाढी संदर्भात विशेष आमसभा घेण्याकरिता नगरसेवक राजेश मिश्रा व नगरसेवक डॉ. झिशान हुसेन, नगरसेवक शशिकांत चोपडे यांनी महानगरपालिकेसमोर आमरण उपोषण सुरु केले होते.

सदर आंदोलनाला जनतेमधून उत्स्फूर्त प्रतिसाद सुद्धा मिळत होता. आंदोलनाच्या चौथ्या दिवशी अकोला महानगरपालिकेचे आयुक्त जितेंद्र वाघ यांनी दुपारी आंदोलकांसोबत चर्चा करुन करवाढी विरोधातील डॉ. झिशान हुसेन यांची जनहित याचिका हायकोर्टाने दाखल केली असून सदर याचिकेवर ११ एप्रिल रोजी सु?नावणी होणार असल्याची माहिती दिली व तशी हायकोर्टाची प्रत सुद्धा आंदोलकांना दिली. त्यामुळे सदर उपोषण तुर्त स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला. आज आंदोलनाला आमदार




गोपीकिशन बाजोरिया, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष हिदायत पटेल, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष नितीन देशमुख, बबनराव चौधरी, राजेश भारती यांनी भेट देऊन आंदोलकांना जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये दाखल केले होते. यावेळी डॉ. अभय पाटील, डॉ. पुरुषोत्तम तायडे, तरुण बगेरे, ओम सांवल, मब्बा पहेलवान, शिवसेना शहर प्रमुख अतुल पवनीकर, युवासेना जिल्हाध्यक्ष विठ्ठल सरप, नितीन मिश्रा, योगेश गिते, मंजुषाताई शेळके, मंगेश काळे, गजानन चव्हाण, अनिता मिश्रा, प्रमिला गिते, सपना नवले, देवश्री ठाकरे, पराग कांबळे, राजकुमारी मिश्रा, मो. ईरफान, ॲड. इकबाल सिद्दीकी, डब्बुसेठ, मुन्ना मिश्रा, दिलीप बोचे, गणेश बुंदेले, कपिल रावदेव, डॉ. सुधीर ढोणे, शरद तुरकर, हरिओम पांडे, विक्कीसिंग बावरी, रुपेश ढोरे, संतोष रणपिसे, सागर कुकडे, प्रकाश वानखडे, सागर भारुका आदींची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती.

सदर आंदोलनस्थळी आयुक्त जितेंद्र वाघ, जिल्हा पोलीस अधीक्षक, सिटी कोतवालीचे ठाणेदार जुमडे आदींसह पोलीसांचा मोठा ताफा आल्याने महापालिकेसमोर काही काळ प्रचंड गर्दी व गोंधळ उडाला होता. आज आंदोलनामध्ये शहरातील महिला सुद्धा मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या तसेच आंदोलनाच्या समर्थनार्थ आज डॉ. जकी अनवर, शेतकरी जागर मंचचे प्रशांत गावंडे, डॉ. जाकीर, गोपाल लव्हाळे उपोषणामध्ये सहभागी झाले होते.

सदर आंदोलनाला शहरातील व जिल्ह्यातील विविध सामाजिक संघटनांनी सुद्धा पाठिंबा दिला होता त्यामध्ये प्रामुख्याने बार असोसिएशन, सेवा फाऊंडेशन, इत्तेहात फाऊंडेशन, अन्याय निवारण कृती समिती, सिंधी जनरल युवा पंचायत, महाराष्ट्र गोंधळी समाज, शिवसंग्राम, कुणबी समाज मंडळ, बाबा हरदासराम सिंधी पंचायत, आदिवासी जनसंग्राम संघटना, अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद, सब्ज बंगला ट्रस्ट, मुस्लिम कब्रस्थान ट्रस्ट, माळी युवक संघटना आदींनी पाठिंबा देऊन आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला.

आंदोलनामध्ये आकाश कवडे, मनोज मिश्रा, पंकज देशमुख, संजय अग्रवाल, योगेश अग्रवाल, भारतभाऊ सत्याल, दिलीप जिवतानी, दिनेश दुबे, दिपू पांडे, मुक्तीनारायण पांडे, प्रकाश वानखडे, सुर्यदेव पांडे, ॲड. उमेश तिवारी आदींनी सक्रिय सहभाग नोंदविला.

# पाण्याची बचत ही काळाची गरज-प्रा.डॉ.वासुदेव गोलाईत





**प्रतिनिधी**/२२ मार्च

**अकोला** : श्रीमती एल.आर.टी. कॉलेज ऑफ कामर्स, अकोला येथील एन.सी.सी. युनिट व्दारे एन.सी.सी. कॅडेट्ससाठी २२ मार्च जागतिक जल दिवसाचे औचित्य साधून महाविघालयाचे प्राचार्य डॉ. एस.जी.चापके सर यांच्या मार्गदषनाने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी व्यासपिठावर महाविघालयाचे वरिष्ठ प्राध्यापक ए.एल.काळे, एन.सी.सी. ऑफिसर लेफ्टनंट डॉ. अनिल तिरकर व प्रमुख वक्ते प्रा. डॉ. वासुदेव गोलाईत, एम.ई.एस. आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, मेहकर हे उपस्थित होते. वक्त्यांचा परिचय करुन दिल्यानंतर प्रास्तविकात एन.सी.सी. ऑफिसर लेफ्टनंट डॉ. अनिल तिरकर यांनी पाण्याची गरज व पाण्याचे उपाययोजन यासंबंधी आपले मत व्यक्त केले. तसेच युनायटेड नेषन कॉन्फरन्स ऑन एन्वारमेंट अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट यांनी प्रथम जागतिक जल दिवस म्हणून २२ मार्च, १९९३ ला साजरा केला. एन.सी.सी. कॅडेट्स पाण्याचे महत्व जाणून सकारात्मक दृष्टिकोनातून विचारमंथन करतील अषी ग्वाही त्यांनी पाहूण्यांना दिली.

प्रमुख वक्ते प्रा. डॉ. वासुदेव गोलाईत यांनी आपल्या व्याख्यानात पाण्याची बचत ही काळाची गरज आहे. त्यासाठी पावसाचे पाणी तळी तसेच विहिरी यामध्ये साठवणे, बंधारे बांधणे छतावरुन वाहून जाणारे पाणी रेन वॉटर हारर्वेस्टींगच्या माध्यमातून जमिनित मुरविणे, शेतातून वाहून जाणारे पाणी पाटांच्या माध्यमातून अडविणे अष्या अनेक माध्यमातून पाण्याचे संरक्षण आपण करु शकतो. तसेच पाण्याच्या जपून वापर आपण करावा हे एन.सी.सी. कॅडेट्ला त्यांनी पटवून दिले. एन.सी.सी. कॅडेट्स सोबत हितगुज करतांना वरिष्ठ प्राध्यापक ए.एल.काळे यांनी ङ्कङ्कपाण्याविना नाही प्राण, पाण्याचे तू महत्व जाणङ्कङ्क या म्हणीच्या माध्यमाने पाण्याचे महत्व व पाण्याची बचत या संदर्भात जनजागृती करणे महत्त्वाचे ठरते यासाठी एन.सी.सी. कॅडेट्स सक्षम आहेत हे त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले.

जागतिक जल दिनानिमित्त घेण्यात आलेल्या हा व्याख्यानाच्या कार्यक्रमाचे संचालन सारजन्ट सुमित पांडे यांनी तर आभार प्रदर्षन सारजन्ट कोमल यादव यांनी केले. या कार्यक्रमासाठी सिनियर अंडर ऑफिसर अमित जांगिड व श्वेता त्रिपाठी, ज्युनियर अंडर ऑफिसर मयुर बाराहाते व साक्षी सरदार यांनी परिश्रम घेतले. तसेच या कार्यक्रमासाठी कारपोरल रामेष्वर ताथोड, सिध्देष देषमुख, सौरभ काळमेघ, पल्लवी मांगटे, वृषाली मराठे व श्रध्दा षिरसाट तसेच विषाल मानतकर, आकाष मुरे, निलिमा यादव व कोमल हाताळकर असे अनेक एन.सी.सी. कॅडेट्स या व्याख्यानाला उपस्थित होते. विघार्थ्याचा सर्वांगिण विकाससाठी असे समाज उपयोगी कार्यक्रम घेण्यात श्रीमती. एल.आर.टी. कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस.जी.चापके सर नेहमी प्रोत्साहीत करतात.

# हद्दवाढ झालेल्या क्षेत्राच्या विकासासाठी १०० कोटी मंजूर

## आ.सावरकर यांच्या प्रयत्नाला यश

**प्रतिनिधी**/२२ मार्च

**अकोला** : अकोला शहराचा महाविकास शहराच्या अकोला पूर्व मतदार संघातील हद्दवाढ झालेल्या क्षेत्राच्या विकासासाठी मा.मुख्यमंत्री यांनी १०० कोटी रुपयाचा विकास आराखडा मंजूर करून शहर विकासासाठी प्रत्यक्ष २० कोटी रुपयाचा निधी उपलब्ध करण्याची ऐतिहासिक मदत आमदार सावरकर यांनी महाविकास पर्वास जनतेला दिलेल्या वाचनाची पूर्तता केली.

आमदार रणधीर सावरकर यांच्या अकोला पूर्वचे ङ्कमहाविकास पर्वङ्क संबंधाने अकोला महानगरपालिका क्षेत्रातील अकोला पूर्व मतदार संघातील हद्दवाढ झालेल्या भागातील नागरिकांच्या मुलभूत गरजा व विकासासाठी १०० कोटी रुपयाचा विशेष निधी. मा. मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांचे मार्गदर्शन व अशीर्वादापोटी दिल्याबद्दल अकोला वासियांतर्फे आ. रणधीर सावरकर यांनी मानले जाहीर आभार.

विधानभवनात मा. मुख्यमंत्री यांचे सोबत अकोला महानगर पालिकेचे विकास व समस्यांबाबत सावरकर यांनी चर्चा केली. हद्दवाढ क्षेत्राच्या विकासासाठी विशेष निधी पोटी केलेल्या मागणी संदर्भाने मा. मुख्यमंत्री यांनी १०० कोटी रुपयाच्या निधी मंजूर केला तसेच अकोला शहराच्या विकासासाठी भविष्यातही निधीची कमतरता भासू देणार नाही असे अभिवचन देत आ. रणधीर सावरकर यांना विकासाची गुडी उभारण्याची सांगितले. अकोलाकारांना गुडीपाडव्याच्या मुहूर्तावर ऐतिहासिक अशी भेट दिली करिता आ. सावरकर यांनी मुख्यमंत्री यांचे मनपूर्वक आभार मानले प्रस्ताव मंजुरीसाठी प्रशासनाचे तत्परते बद्दल नगर विकास विभागाच्या प्रधान सचिव मनीषा म्हैसकर यांचे प्रती सुद्धा आभार व्यक्त केले.

अकोला महानगर पालिका अस्तित्वात आल्यानंतर दीर्घकाळ सुमारे १७ वर्षापासून महानगरपालिकेची हद्दवाढ झाली नव्हती. जिल्ह्याचे खासदार संजय धोत्रे, जेष्ठ आमदार गोवर्धन शर्मा यांच्या सतत प्रयत्नाद्वारे अकोला महानगर पालिकेची हद्दवाढ करण्यात आली. हद्दवाढी मधील प्रस्तावित ग्रामीण भाग हद्दवाढीसाठी अनुकूल नव्हता. हद्दवाढी मधील सुमारे २४ गावांमधील मतदार हा ग्रामीण मतदार संघातील होता, या प्रस्तावित गावांतील नागरिकांना विकासाचे महत्व व विश्वास आमदार सावरकरांनी पटवून दिला. राज्याचे भाजपा शासन व मुख्यमंत्री ना. फडणवीस साहेबांच्या विकासाभिमुख प्रशासनाची आमदार रणधीर सावरकर यांनी ग्वाही दिली. जनतेने सुद्धा विश्वास दर्शिविला, त्याची फलनिष्पती म्हणजे महानगर पालिकेच्या निवडणुकीमध्ये हद्द वाढ झालेल्या क्षेत्रातील ३२ पैकी २८ नगर सेवक जनतेने निवडून देऊन भाजपाला प्रचंड यश मिळाले. सोबतच अकोला महानगरमध्ये प्रचंड बहुमताने भाजपाची एकहाती सत्ता आली. अकोला शहराचे विकासासाठी खासदार संजयभाऊ धोत्रे यांचे मार्गदर्शन शहराचे जेष्ठ आमदार गोवर्धन शर्मा व आमदार रणधीर सावरकर या आमदारद्वयानी अकोला शहराचा ऐतिहासिक विकास साधल्याचे अकोलेकर साक्षीदार आहेत.

अकोल्याचे राजराजेश्वर नगरीला वैभवशाली बनविण्याच्या दिलेल्या वाचनाची पूर्तता भाजपा करीत आहे. अकोला शहराचे महापौर विजय अग्रवाल, उपमहापौर वैशालीताई शेळके, तत्कालीन स्थायी समिती सभापती बाळ टाले, हद्दवाढ प्रभागातील सर्व नगरसेवक, भाजपा महानगर अध्यक्ष किशोर मांगटे पाटील, चारही सरचिटणीस तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते, आयुक्त महानगर पालिका, मनपा शहर अभियंता इत्यादी सर्वानीच नागरी मुलभूत सुविधांबाबत नागरिकांसोबत प्रत्यक्ष संवाद साधला हे विशेष.

# राष्ट्रीयकृत बँकाची आढावा बैठक संपन्न

**प्रतिनिधी**/२२ मार्च

**अकोला** : जिल्हाधिकारी अस्तिक कुमार पांडेय यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार दि.२१ मार्च २०१८ रोजी राष्ट्रीयीकृत बँकाचे रिजनल मॅनेजर यांची आढावा बैठक संपन्न झाली. या सभेस सेंट-ल बँक ऑफ इंडियाचे रिजनल मॅनेजर आर. एल. चौहान, स्टेट बँक ऑफ इंडियाचे रिजनल मॅनेजर एस. के. मनचंदा, विदर्भ कोकण ग्रामिण बँकेचे रिजनल मॅनेजर आर. आर. खाडे तसेच बँक ऑफ महाराष्ट्ङ्क चे रिजनल मॅनेजर एस एस. वाघ, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक तुकाराम गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी जिल्ह्यामधील बँकांमार्फत सर्व प्रकारच्या सरकारी कर्ज योजनांची अंमलबजावनीचा आढावा घेण्यात आला व आतापर्यंत झालेली उद्दीष्ट पुर्ती आणि उपलब्ध आठवड्याचा यथोचित वापर करुन राहीलेल्या कर्ज प्रकरणांचा निपटारा करुन प्रलंबीत प्रकरणांची संख्या शुन्य पातळीवर आणावी या बाबत जिल्हाधिकारी अस्तिक कुमार पांडेय व सर्व रीजनल मॅनेजर यांचे मधे एकमत झाले त्यावर कार्यवाही करण्याच्या सर्व शाखांना सुचना देऊन पुर्ततेचे आश्वासन जिल्हाधिकारी यांना सर्वा तर्फे देण्यात आले.

जिल्हाधिकारी अस्तिक कुमार पांडेय यांनी जिल्ह्यातील पुढील वर्षात राबविन्यात यावयाच्या काही महत्वाकांक्षी योजनांची चर्चा केली. त्यात ङ्कमुद्राङ्क योजने अंतर्गत रोजगार निर्मितीच्या वेगवेगळ्या संधींबाबत बारकाईने चर्चा करण्यात आली.

त्या सोबत देश भर गाजत असलेल्या व विशेष करुन मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी जी यांनी ङ्क मन की बातङ्क मधे उल्लेख केलेल्याङ्क मोर्णा नदी स्वछता अभियानाङ्क बाबत सविस्तर माहीती देऊन, पुढील दोन योजनांची पण माहीती दिली. त्यात एक आहे मोर्णा नदीच्या पात्रा मधे उपल्बध जागेत बगिचा / गार्डन तयार करणे आणी काठावर ङ्कघाटङ्क बांधणी या कार्यात बँकांनी पण सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हाधिकार्यानी केले, त्यास सर्वच रीजनल मॅनेजर महोदयांनी उस्फुर्त सहमती दर्शविली. जिल्ह्याच्या विकास कामांमधे यापुढेही बँकांनी असेच सहकार्य राहील अशी अपेक्षा व्यक्त केली. जिल्ह्याची अग्रणी बँक , सेंट-ल बँक ऑफ इंडिया चे व्यवस्थापक तुकाराम गायकवाड यांनी सर्वाचे आभार मानले.



# मुर्तिजापूर येथील जलशुद्धीकरण केंद्राला आ.पिंपळेंची भेट

**प्रतिनिधी**/२२ मार्च

**मुर्तिजापूर** : तालुक्यातील घुंगशी बॅरेज येथून पाईपलाईन टाकून मुर्तिजापूरकरांना उन्हाळयात पाणीटंचाईचे चटके जाणवू नये याकरीता पाणी आणण्याचे प्रयत्न आमदार हरिष पिंपळे, नगराध्यक्षा सौ.मोनाली कमलाकर गावंडे यांच्या प्रयत्नातुन सुरू आहे. सदर पाईप लाईन टाकण्याचे काम जलद गतीने केले जात असून सदयास्थितीत खरप ढोरे शिवारापर्यंत पाईपलाईनचे काम आले आहे. त्यामुळे येणा-या काही दिवसात मुर्तिजापूर येथील जलशुद्धीकरण केंद्र येथे पाणी उपलब्ध होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. याकामाची पाहणी नुकतीच आमदार हरिष पिंपळे यांनी भेट देवून केली. त्यावेळी त्यांनी लवकरात लवकर काम पूर्ण करण्याबाबत सूचना केल्या. यावेळी त्यांच्या सोबत नगरसेवक सुनील पवार, माजी नगराध्यक्षा द्वारकाप्रसाद दुबे, कमलाकर गावंडे तसेच बबलु भेलोंडे, नसीरभाई, गजानन नाकट यांची उपस्थिती होती.